The Berar General Education Society Akola's

# Shri Kisanlal Nathmal Goenka Arts & Commerce College
## Karanja Lad, Dist - Washim

(Affiliated To Sant Gadge Baba Amravati University, Amravati)
(Reaccredited By NAAC With B+ Grade With 2.56 C.G.P.A.)

**A One Day National Level Conference**
**ON**
## Indian Youth : Challenges & Opportunities
**Date : Monday, 10th February, 2020**

# Certificate

This Is To Certify That Dr. / Prof. / Shri. / Ku. अलका अनिल मानकर

Has Participated In National Level Conference At Shri Kisanlal Nathmal Goenka Arts & Commerce College, Karanja (Lad) Dist. Washim. He/ She Has Presented A Paper On शेती आणि युवक

Dr. Nilam M. Chhangani
Convenor

Prof. Prashant Shirsat
Co-Convenor

Dr. V. R. Kodape
Officiating Principal

Impact Factor – 6.625 | Special Issue – 229 (C) | February 2020 | ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

**Multidisciplinary International E-Research Journal**

**PEER REVIEWED, INDEXED AND REFEREED JOURNAL**

SPECIAL ISSUE 229 (C)

# भारतीय युवक : आव्हाने आणि संधी



- अतिथि संपादक -

**डॉ. व्ही. आर. कोडापे**

- मुख्य संपादक -

**डॉ. धनराज टी. धनगर**

- कार्यकारी संपादक -

**डॉ. एन. एम. छंगाणी**

**प्रा. पी. एस. शिरसाट**

For Details Visit To : www.researchjourney.net

*Printed By* : PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

65. राजकारण आणि युवक ........................................ 1
प्रा. डॉ. आशिष मुट्ठे

66. शेती आणि युवक ........................................ 15
कु. सोनाली गजानन अहिर, डॉ. प्रा. अल्का मानकर

67. युवकामधील बेरोजगारीच्या समस्येचे विश्लेषणात्मक अध्ययन ........................................ 16
प्रा. अमरिष एस. गावंडे

68. भारतातील बेरोजगारी, अशांतता आणि आजचा युवक ........................................ 16
डॉ. संतोष धामणे, प्रा.डॉ. गजानन वनचरे

69. बेरोजगारी आणि युवक ........................................ 16
प्रा. विशाल भिवसेन भिसे, प्रा. डॉ. वैशाली भिवसेन भिसे

70. आजचा भरकटलेला तरुण उद्याचे जग घडवेल काय? ........................................ 1
प्रा. स्मिता रा. देवर (भोंडे)

RESEARCH JOURNEY Internationl Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor (SJIF) - 6.625 | Special Issue 229 (C) : भारतीय युवक : आव्हाने आणि संधी
ISSN : 2348-7143
February 2020

# शेती आणि युवक

कु. सोनाली गजानन अहिर
संशोधक विद्यार्थी
डॉ. प्रा. अल्का मानकर

**प्रस्तावना :**

आपला देश शेती प्रधान आहे. देशातील ८०% लोक शेतीवर अवलंबून आहेत. हे वर्षानुवर्ष आपण ऐकत आलोत, पण खरच शेती किती जण करतात, शेती करणाऱ्यांची संख्या किती आहे हे आपल्याला माहित आहे का ?

या संदर्भातली वस्तुस्थिती समजुन घेतली तर, आपल्याला धक्का बसेल. बेभरोशी शेती आणि जगण्याची ऐशीतैशी, हे वास्तव कायमच डोळ्यासमोर असल्याने ग्रामीण भागातील शेती करण्यास आता कोणीही तयार होत नाही. शेतीतील तरुण मुलांची संख्या तर झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे वय ही वाढत चाललय.

'डाऊन टू अर्थ' या संस्थेचे अभ्यासक रिचर्ड महायात्रा यांच्या अभ्यासानुसार काळ्या मातीत धान्य पिकवणाऱ्या आणि जगाला 'जगवणाऱ्या' शेतकऱ्यांचं भारतातलं सरासरी वय पन्नाशीच्या पार गेलं आहे. सन २०१६ मध्ये केलेल्या एका पाहणीत भारतीय शेतकऱ्यांचे सरासरी वय होत ५० वर्ष, सन २०११ साली झालेल्या जनगणनेनुसार भारतात दररोज सरासरी दोन हजार शेतकरी शेतीला रामराम ठोकताहेत. या संदर्भातलं वास्तव इतके धक्कादायक आहे की, शेतकी विद्यापीठातून शेतीशास्त्राचे शिक्षण घेतलेल्या आणि घेत असलेल्या तरुण विद्यार्थ्यांनीही शेतीकडे पाठच फिरवली आहे आणि शेती सोडून दुसऱ्या क्षेत्राकडे त्यांनी आपले लक्ष वळवले आहे. अर्थातच याचं कारणही स्पष्ट आहे. लहरी हवामान आणि बेभरोशी शेती. इतर क्षेत्रातुन मिळणाऱ्या उत्पन्नाचं प्रमाण शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा किमान पाच पटीने अधिक आहे.

या संदर्भात 'प्रथम' या संस्थेनं सन २०१७ साली तीस हजार तरुणांचा एक अभ्यास केला या अभ्यासानुसार यातील केवळ १.२ टक्के तरुणांना शेती हा व्यवसाय म्हणून स्वीकारायचा होता. १८ टक्के तरुणांनी आर्मीला तर १२ टक्के तरुणांनी इंजिनिअरिंगला पसंती होती. 'प्रथम' या संस्थेचे संस्थापक माधव चव्हाण यांच्या म्हणण्यानुसार शेतीतील तरुणांची संख्या कमी होते आहे, हे तर खरेच, पण शेतीच शेतकऱ्यांना बाहेर काढतेय हेही यासंदर्भातलं एक मोठं वास्तव आहे. भारताची लोकसंख्या जशी वाढतेच, तशीच घरकुलांची संख्याही गेल्या दहा वर्षात घरकुलांची संख्या तब्बल ३३% टक्क्यांनी वाढलीय. त्यामुळे शेती परवडेनाशी झालीय.

अर्थातच ही स्थिती फक्त भारतातच आहे. असं नाही, अख्या जगभरातल्या तरुणांना शेती नकोशी आहे. अमेरिकेत आज शेतकऱ्यांचं सरासरी वय आहे ५८ वर्षे तर जपानमध्ये ६७ वर्ष, युरोपमध्ये प्रत्येक तिघांतला एक शेतकरी पासष्टीच्या पुढचा आहे. पुढच्या सहा वर्षात जपान मधल्या ४० टक्के शेतकऱ्यांनी शेती सोडलेली असेल, अशी स्थिती आहे. सन २०५० पर्यंत भारताची लोकसंख्या १९० कोटीच्या आसपास जाण्याची शक्यता आहे. अशावेळी अन्नधान्याचं उत्पादन हे भारतापुढचं सर्वोच्च असणार आहे. मात्र याचा विपरित स्थितीत आशेचा एक किरण ही डोकावतो आहे. जगभरात शेतकऱ्यांची 'डिमांड' मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. या क्षेत्रात खूप मोठी पोकळी निर्माण झाल्यानं खोऱ्यानं पैसे मिळवण्याची अनोखी संधी ही त्यांच्यापुढे चालुन येणार आहे.

भारताच्या अर्थव्यवस्थेत खूपच वैविध्य दिसुन येते. शेती, हस्तव्यवसाय, कापडा गिरण्या, उद्योगधंदे, उत्पादन आणि विविध प्रकारच्या सेवा अशा अनेक गोष्टींचा समावेश त्यात होतो. भारतात काम करणाऱ्या लोकांपैकी दोन - तृतियांश लोकांचा उदरनिर्वाह अजुनही शेती अथवा शेतीशी संबंधीत उद्योगांवर चालतो, परंतु अर्थव्यवस्थेत विविध प्रकारच्या सेवांचा हि वाढता वाटा आहे आणि अलिकडे सेवांवर आधारित व्यवसाय ही अर्थव्यवस्थेत अतिशय महत्वाची भुमिका बजावत आहेत. अलिकडील काही वर्षात भारतातील संगणक तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे तसेच उच्चशिक्षीत आणि इंग्रजी बोलू शकणाऱ्या वाढत्या तरुण पिढीमुळे भारत हळुहळु सर्व जगाला बाह्यस्त्रोताच्या सेवा पुरवणारा देश म्हणून भूमिका बजावायला लागला आहे. भारत हा अति - कुशल तंत्रज्ञ पुरवणारा जगातील सर्वात मोठा निर्यातक आहे. याच बरोबर उत्पादन, औषधनिर्माण, जैवतंत्रज्ञान, अतिसूक्ष्म तंत्रज्ञान, दुरसंचार, जहाज निर्माण, विमान निर्माण आणि पर्यटन ह्या क्षेत्रांमधील भारताची क्षमताही वेगाने वाढतांना दिसत आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या बऱ्याचशा काळात भारतामध्ये समाजवादी अर्थ व्यवस्थेचा मार्ग अवलंबण्यात आला. भारतात सुरुवातीस खाजगी क्षेत्राच्या अर्थव्यवस्थेतील सहभागावर, परदेशांशी व्यापारावर आणि इतर देशांकडून भारतात होणाऱ्या थेट गुंतवणुकीवर कडक बंधने होती. मात्र १९९० च्या दशकाच्या सुरुवातीपासून भारताने हळुहळु परकीय गुंतवणुकीवरील आणि व्यापारावरील नियंत्रण कमी करुन आपली अर्थव्यवस्था आर्थिक सुधाराव्दारे खुली करायला सुरुवात केली आहे. मात्र राजकारणातील मतभेद आणि भिन्न विचारधारांमुळे, सरकारी उद्योगांचे खाजगीकरण आणि विशिष्ट क्षेत्रांमधील खाजगी आणि परकीय सहभागाला मार्ग खुला करणे अशा आर्थिक सुधारांमधील काही महत्वाच्या गोष्टी मंद गतीने पुढे सरकत आहेत.

अतिशय वेगात वाढणारी लोकसंख्या आणि वाढती आर्थिक आणि सामाजिक विषमता हे भारतापुढील महत्वाचे प्रश्न आहेत. गरिबी हा ही गंभिर प्रश्न आहे, मात्र स्वातंत्र प्राप्तीनंतर गरीबीचे प्रमाण बरेच घटत असल्याचे दिसते. अधिकृत चाचणी नुसार सन २००४-

०५ मध्ये भारतातील २७% लोक दारिद्ररेषेच्या खाली होते.(७) दारिद्र्य कमी करण्यासाठी त्यांच्या अडचणी दूर करण्याची गरज आहे.

शेती व उद्योग ही अर्थव्यवस्थेतील महत्वपूर्ण अशी क्षेत्रे आहेत. ही दोन्ही क्षेत्र परस्परपुरक आहेत. असे असले तरी या दोन क्षेत्रांमध्ये महत्वाचा फरक आहे. जास्तीत जास्त ते लोक हे उद्योग, कंपनी या दिशेला धावतात. यामध्ये कृषीचे अर्थशास्त्रचे स्वरुपही वेगळे ठरते. यातील आपण फरक पाहाल तर असे दिसुन येते की,

**दृष्टिकोनाचा फरक :** उद्योगाकडे बघण्याचा दृष्टिकोन पूर्णपणे व्यापारी असतो. शेतीचे व्यापारीकरण हे आधुनिक काळातील आहे. आतापर्यंत व अजूनही शेती म्हणजे उपजीविकेचे एक साधान शेती म्हणजे जीवन जगण्याचा मार्ग असाच शेतीबाबत दृष्टिकोन आहे. त्यामुळे शेतकऱ्यांपेक्षा उद्योगपती नेहमीच फायद्यात असतो. असे आजच्या पिढीला (युवकाला) वाटत आहे. पण काय हे खरे आहे का ? आपण पाहातो की, आजकाल जेव्हा लग्नाची वेळ येते तेव्हा शेती करणारा मुलगा नकोय असे लगेच म्हणतात. नोकरी करणाराच मुलगा हवा आहे. मग काय शेती करणाऱ्या मुलांनी लग्नच नाही करावे का ? सर्वांनी असे म्हटले तर काय होणार ?

पूर्वी शेतीवर जास्तीत जास्त भर होता. मात्र आता नाही. पण आपण विचार केला तर पाहा शेती नसेल तर आपण कस जगणार शेती पिकवली नाही तर काय खाणार ? पण हे युवकाच्या लक्षात का नाही येत ? कृषी उद्योगाचा चेहरा मोहरा पूर्णपणे बदलत असुन या क्षेत्राला कुशल, नवीन संकल्पना राबविणाऱ्या नवनवीन सुधारणा स्विकारणाऱ्या आणि उत्पादनासाठी नवे मार्ग शोधणाऱ्या प्रशिक्षित व्यक्तींची निकड आहे. हे मनुष्यबळ युवा वर्गाच्या रुपात उपलब्ध होणे ही काळाजी गरज आहे.

रोजगार संधीच्या दृष्टीतून कृषीक्षेत्राकडे पाहण्याचा युवा पिढीचा रोख गेल्या काही वर्षापर्यंत नकारात्मक आहे असे जाणवायचे. त्यामागे अनेक कारणे होती. यातील प्रमुख म्हणजे कृषी क्षेत्रातील रोजगार संधी बद्दलची अन्नभिन्नता आणि शेतीतील कामाला समाजात प्रतिष्ठा मिळणार नाही. तसेच या कामांतील आमदनी तुलनेने कमी आणि बेभरवशाची असे गैरसमज. मात्र आज कृषि उद्योगात अशा अनेक नोकरीच्या संधी शक्य आहेत, ज्या योगे उत्तम मिळकत तर होईलच, शिवाय तुमच्या कामाला समाजामान्यताही मिळेल. या सर्व गोष्टींची माहिती युवापिढीपर्यंत पोहोचवता आली आणि यात सरकारी यंत्रणांचा पाठिंबा मिळाला, तर कृषी शिक्षण आणि कृषी उद्योगातील संधीकडे युवावर्गाचा ओघ वाढेल.

शेती क्षेत्रात तरुणांचा सहभाग महत्वाचा ठरतो कारण कृषी क्षेत्रात आता पुर्वीइतके मेहनेतीचे काम राहले नसुन अनेक तांत्रिक सुधारणा व उपकरणांचा अंतर्भाव झाल्याने तरुण या क्षेत्राकडे वळुन योग्य माहिती व तंत्रज्ञानाचा उपयोग करुन स्वत:ची प्रगती करु शकतात आणि स्वत:ला व शेती कामाला प्रतिष्ठा मिळवून देऊ शकतात. तसेच देशातील वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागवण्यासाठी जास्तीत जास्त तरुण होतकरु पिढी या क्षेत्रात उतरून शेतीचे उत्पादन वाढवण्याची आता आवश्यकता आहे.

सध्या शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पिढीची जागा जर तरुण (आजच्या युवकाने) शेतकऱ्यांनी घेतली नाही, तर त्याच जुन्या पध्दतीने केलेल्या शेतीतुन मिळणाऱ्या तुटपुंज्या अन्यधान्य निर्मितीचा मेळ वाढत्या अन्नधान्याच्या गरजेशी लागणे कठीण आहे.

देशातील शेती व्यवसायाकडे नवीन पिढीचे असेच दुर्लक्ष होत राहीले तर नजीकच्या भविष्यात शेती उत्पादने आयात करावी लागतील. समाज मनातील शेतकऱ्यांची असलेली गरीब खेडवळ ही प्रतिमा बदलण्याची गरज आहे. नित्यनवीन तंत्रज्ञान आणि नव्या संकल्पना लीलया ग्रहण करणारी तरुणपिढी हा बदल सहज घडवुन आणू शकेल. तरुण पिढीची ऊर्जा व काम करण्याची धडाडी पाहता शेती उद्योगाच्या उत्पादन क्षमतेत भरपुर वाढ होऊ शकेल.

युवक वर्गाला शेती व्यवसायातील प्रगतीच्या संधीकडे आकर्षीत करण्यासाठी सर्व पातळ्यांवर प्रत्यन होणे गरजेचे आहे. शाळांमधून वेळोवेळी मुला – मुलींना या व्यवसायाबद्दल सकारात्मक माहिती देण्याची गरज आहे. नोकरी शोधणाऱ्या युवा वर्गाला शेती व्यवसायाकडे आकृष्ट करणे महत्वाचे ठरते. सध्याच्या शिक्षण पध्दतीत 'शेती' हा विषय अभ्यासक्रमांतून वगळण्यात आलेला दिसतो. ज्या अन्नावर आपण आपला देह पोसतो ते पिकवणाऱ्या कृषी क्षेत्राबद्दलही विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता, आवड निर्माण होणे गरजेचे ठरते.

शैक्षणिक अभ्यासक्रमांतून शेती शिक्षण योग्य प्रकारे युवापिढीसमोर सादर करायला हवा. सध्या शेती उद्योगात टिकून असलेल्या तरुणांची यशोगाथा उर्वरित तरुण पिढीसमोर आणायला हवी. जेणेकरुन कृषी क्षेत्राबद्दल त्यांना आकर्षण निर्माण होईल. याकामी मोबाईल फोन, संगणक, इंटरनेट यांचा प्रभावी उपयोग होईल.

जगभरातील १५ वर्ष ते २४ वर्ष वयोगटातील एक अब्ज लोकसंख्येपैकी खुप मोठ्या प्रमाणावर युवावर्ग अशिक्षित, कुपोषित, उपाशी आणि गरिबाने गाजलेला आहे. त्यांच्याकडे नोकरी मिळवण्या योग्य कौशल्य नसल्याने, यातील ग्रामीण युवावर्ग अर्थार्जनाच्या संधीसाठी स्थलांतर करतो. जर तरुणांना योग्य पाठिंबा आणि संधी दिली तर त्यांच्यातील अतुल्य क्षमता, ग्रामीण सुधारणांच्या कामात भरीव कार्य करु शकेल यामुळे त्यांची प्रगती होईलच त्याच बरोबर देशाचही आर्थिक प्रगती शक्य होईल. आव्हानात्मक नोकरीच्या संधीसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरुन केलेली शेती हा एक मार्ग आहे.

कृषी उद्योगाला चेहरा आता पूर्ण बदलला आहे. या क्षेत्राला कुशल, नवीन संकल्पना राबविणाऱ्या नवनवीन सुधारणा स्विकारणाऱ्या प्रशिक्षीत व्यक्तींची गरज आहे. हे तरुण पदवीधर कुशल माहिती तज्ज्ञ, बदलत्या काळानुसार विचार करणारे, स्वत:बद्दल काळानुसार विचार करणारे, स्वत:बद्दल आत्मविश्वास असणारे असायला हवेत. शेती क्षेत्रातील पदवीच्या बळावर विद्यार्थी अन्य क्षेत्रात ही नोकरी मिळवु शकतात. भारतातील अनेक कृषी महाविद्यालयापैकी बारामतीचे 'द कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर' हे महात्मा फुले विद्यापिठाशी जोडलेले आहे. जेव्हा मित्र–मैत्रिणींनों आपल्या जगण्याचा मुलाधार असलेल्या शेती व्यवसायाकडे दुर्लक्ष करण्यापेक्षा त्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहिल्यास, तेव्हा करिअरचे क्षेत्र निवडताना कृषी क्षेत्राचा प्राधान्याने विचार व्हायला हवा.

**तरुणांमध्ये शेतीबद्दल 'स्वारस्य' निर्माण करणे :**

शेतीला प्रतिष्ठेचा प्रश्न भेडसावतो आहे. साध्या शब्दात सांगावयाचे झाले तर, जगभरातील बहुसंख्य तरुणांसाठी शेतीमध्ये काही 'खास' किंवा आकर्षक असे काही दिसत नाही. बहुतेक जण असा विचार करतात की, शेती म्हणजे केवळ पाठीचा कणा मोडणारी मजुरी. ती सुध्दा फारसा आर्थिक फायदा न देणारी – आणि आपल्या करीअरच्या प्रगतीसाठीची अगदी छोटीशी संधी. शेतकऱ्यांची पिढी जुनी होत असल्याच्या पार्श्वभुमीवर कृषी क्षेत्राकडे नव्या तरुणांनी आकर्षिले जाण्याची गरज आहे.

जागतिक स्तरावर हे आव्हान निर्माण झाले आहे. संयुक्त राष्ट्रातले जवळ जवळ निम्मे शेतकरी ५५ वर्ष वा त्याहून अधिक वृध्द आहेत, तर उपसहारा अफ्रिकेमध्ये शेतकऱ्यांचे सरासरी वय ६० वर्ष आहे. पर्यावरण व विकासासाठी काम करणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्थेचा (IIED) अलिकडील अहवाल असे सांगतो की, ''ग्रामीण भागातील तरुणांचे दुर जाणे म्हणजे उदयाच्या काही लघु शेतकऱ्यांचे दूर जाणे आहे, ज्यामुळे शेतीचे भविष्य वेगाने बदलण्याची संभाव्य शक्यता आहे.'' कृषी क्षेत्रात कार्यरत असणारे युवक शेती बाबत कसा विचार करतात या अभ्यासासाठी उत्तरप्रदेशातल्या कृषी हवामानावर आधारित नऊ प्रादेशिक विभागांपैकी बुंदेलखंडची निवड करण्यात आली. काही भागांमध्ये पारंपारिक पध्दतीने केल्या जाणाऱ्या शेतीवरच येथील अर्थव्यवस्था अवलंबून आहे.

**संदर्भसूची :**

१) लोकराज्य जुन २०१९.
२) झामरे ग.ना. (भारतीय अर्थव्यवस्था)
३) लोकमहर्षि भाऊसाहेब, डॉ. पंजाबराव देशमुख गौवर ग्रंथ.
४) भारताची अर्थव्यवस्था-डॉ.केरुलकर र.पु., विद्या प्र.नागपुर २००६
५) भारतीची अर्थव्यवस्था – कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद १९९९ डॉ. सोळुंके आर.एस.
६) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था – अरुणा प्रकाशन, लातुर २००९ डॉ. नि.डी. इंगळे
७) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था – प्रशांत पब्लीशर्स, जळगांव २०१६ डॉ. मंगला जंगले.
८) mr.virkaspedia.in
९) https://www.loksatta.com - 05 Aug 2013

**गोषवारा**

आपला देश शेती प्रधान आहे. देशातील ८०% लोक शेतीवर अवलंबुन आहेत. हे वर्षानुवर्ष आपण ऐकत आलात, पण खरंच शेती किती जण करता, शेती करणाऱ्यांची संख्या किती आहे हे आपल्याला माहिती आहे का ? या संदर्भातील वस्तुस्थिती समजुण घेतली तर आपल्याला धक्का बसेल, बेभरोशी शेती आणि जगण्याची ऐशीतैशी, हे वास्तव कायमच डोळ्यासमोर असल्याने ग्रामीण भागातही शेती करण्यास आता कोणी तयार नाही. शेतीतील तरुण मुलांची संख्या तर झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे शेती करणाऱ्या शेतकऱ्याच वय ही वाढत चाललय.

''या संस्थेचे अभ्यासक रिचर्ड महापात्रा यांच्या अभ्यासानुसार काळ्या मातीत धान्य पिकवणाऱ्या आणि देशाला जगवणाऱ्या शेतकऱ्यांचे भारतातील सरासरी आणि वय पन्नाशीच पार गेलं आहे. २०१६ मध्ये केलेल्या एका पाहणीत भारतीय शेतकऱ्याच सरासरी वय होत ५० वर्ष २०११ साली झालेल्या जनगणनेनुसार भारतात दररोज सरासरी दोन हजार शेतकरी शेतीला रामराम ठोकत आहेत. या संदर्भातील वास्तव्य इतके धक्कादायक आहे की, शेतकी विद्यापीठातून शेती शास्त्राचे शिक्षण घेतलेल्या आणि घेत असलेल्या तरुण विद्यार्थ्यांनीही शेतीकडे पाठच फिरवली आहे आणि शेती सोडुन दुसऱ्या क्षेत्राकडे त्यांनी आपले लक्ष वळवले आहे. अर्थातच याच कारणही स्पष्ट आहे. लहरी हवामान आणि बेभरोशी शेती. इतर क्षेत्रातुन मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण शेतीतुन मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा किमान पाच पटिने अधिक आहे. या संदर्भात 'प्रथम' या संस्थेला २०११ साली तीस हजार तरणांचा एक अभ्यास केला. या अभ्यासानुसार यातील केवळ १.२ टक्के तरुणांना शेती हा व्यवसाय म्हणून स्विकारायचा होता. १८ टक्के तरुणानी आर्मीला तर १२ टक्के तरुणांनी इंजिनिअरिंगला पसंती दिली होती. भारताची लोकसंख्या जशी वाढतेच तशीच घरकुलांची संख्याही गेल्या दहा वर्षात घरकुलांची संख्या तब्बल ३३ टक्क्यांनी वाढलीय त्यामुळे ही शेती परवडेनाशी झालीय.

अर्थातच ही स्थिती फक्त भारतातच आहे असे नाही, अख्या जगभरातल्या तरुणांना शेती नकोशी आहे. अमेरिकेत आज शेतकऱ्यांच सरासरी वय आहे ५८ वर्षे तर जपान मध्ये ६७ वर्ष युरोपमधला प्रत्येक तिघांतला एक शेतकरी पासष्टीच्या पुढचा आहे. पुढच्या सहा वर्षात जपान मधल्या ४० टक्के शेतकऱ्यांनी शेती सोडलेली असेल, अशी स्थिती आहे. सन २०५० पर्यंत भारताची लोकसंख्या १९० कोटीच्या आसपास जाण्याची शक्यता आहे. अशावेळी अन्नधान्याच उत्पादन हे भारतापुढच सर्वोच्च असणारा आहे, मात्र याच विपरित स्थितीत आशेचा एक किरणही डोकावतो आहे. जगभरात शेतकऱ्यांची 'डिमांड' मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. शेती क्षेत्रात तरुणांचा सहभाग महत्त्वाचा ठरतो. कारण कृषी क्षेत्रात आता पुर्वी इतके मेहनतीचे काम राहिले नसून अनेक तांत्रिक सुधारणा व उपकरणांचा अंतर्भाव झाल्याने, तरुण या क्षेत्राकडे वळुन योग्य माहिती व तंत्रज्ञानाचा उपयोग करुन स्वत:ची प्रगती करु शकतात. देशातील शेती व्यवसायाकडे नवीन पिढिचे असेच दुर्लक्ष होत राहिले तर नजीकच्या भविष्यात शेती उत्पादने आयात करावी लागतील. समाज मनातील शेतकऱ्यांची असलेली गरीब, खेडवळ ही प्रतिमा बदलण्याची गरज आहे. नित्यनविन तंत्रज्ञान आणि नव्या संकल्पना लीलया ग्रहण करणारी तरुण पिढी हा बदल सहज घडवून आणू शकेल. तरुण पिढीची उर्जा व काम करण्याची धडपडी पाहता शेती उद्योगाच्या उत्पादन क्षमतेत भरपुर वाढ होऊ शकेल.

युवक वर्गाला शेती व्यवसायातील प्रगतीच्या संधीकडे आकर्षित करण्यासाठी सर्व पातळ्यांवर प्रयत्न होणे गरजेचे आहे. शाळांमधील वेळोवेळी मुला-मुलींना या व्यवसाया बद्दल सकारात्मक माहिती देण्याची गरज आहे. नोकरी शोधणाऱ्या युवा वर्गाला शेती व्यवसायाकडे आकृष्ट करणे महत्वाचे आहे.